**महाराष्ट्र शासन**
**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२**
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशेसं-२००७/९०/प्र.क्र.९५/२००७/३५ दिनांक :- ३ सप्टेंबर, २००७.

# ना-हरकत प्रमाणपत्र

जदीद अंजुमन - ई - तालीम , सर्वे नं. १०, इस्लामपुरा, मालेगांव, नाशिक या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.९.७.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. या अर्जातील माहिती व अर्जासोबतच्या संबंधित कागदपत्रांची प्राथमिक छाननी, याकरिता नियुक्त केलेल्या छाननी समितीने केली. छाननी समितीच्या निष्कर्षानुसार तसेच दि. २९ ऑगस्ट, २००७ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक(मुस्लिम) / भाषिक (उर्दु) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४ च्या कलम २ (छ) च्या अर्थानुसार व भारतीय संविधानाच्या कलम ३० अंतर्गत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

हे ना-हरकत प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील तीन वर्षाकरिता विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंस- २००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील. या निकष व अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेचा अल्पसंख्याक दर्जा रद्द करण्यात येईल.

सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

**( डॉ. क्षत्रपति शिवाजी )**
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२
सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

Attested
Principal
J.A.T. Arts, Science and Com. College (For Women)
Malegaon (Nashik)

**महाराष्ट्र शासन**

**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव**

अल्पसंख्याक विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००८/९०/(८२)/प्र.क्र.३५९/२००८/का.१,  दिनांक :- ६ ऑक्टोबर, २००९.

## <u>अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र</u>

जदीद अंजुमन-ई-तालीम, सर्वे नं.१०, इस्लामपूरा, मालेगांव, नाशिक या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.९.७.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जास अनुसरुन तत्कालीन सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२, सामान्य प्रशासन विभाग यांनी संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या सुनावणीअंती दिनांक ३ सप्टेंबर, २००७ रोजी सदर संस्थेस शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित केलेल्या तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २००७-०८पासून पुढील तीन वर्षाकरिता धार्मिक (मुस्लिम) व भाषिक (उर्दू) अल्पसंख्याक दर्जा प्रदान केला होता.

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक:अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ च्या परिच्छेद (१०) मध्ये विहित तरतूदीनुसार सदर संस्थेने सादर केलेल्या दिनांक ७.७.२००९ च्या अर्जास अनुसरुन जदीद अंजुमन-ई-तालीम, सर्वे नं.१०, इस्लामपूरा, मालेगांव, नाशिक या शैक्षणिक संस्थेस याद्वारे धार्मिक (मुस्लिम) व भाषिक (उर्दू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी.एफ.थेकेकरा

**( टी. एफ. थेकेकरा )**

सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव,

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन.

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

अल्पसंख्याक विकास विभाग

महाराष्ट्र शासन